अरुणाचल प्रदेश येथे महाराष्ट्राची दमदार कामगिरी

८ सुवर्ण,२ रजत आणि ३ कांस्य अशी १३ पदकांची कमाई

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

लोअर दीबांग व्हॅली, रोईंग, अरुणाचल प्रदेश येथे दि.१२ ते १५ फेब्रुवारी दरम्यान सुरू असलेल्या २२ व्या राष्ट्रीय MTB सायकलिंग चॉंपियनशिप मध्ये महाराष्ट्र संघाने पदकांची लयलूट करत आपली ताकद सिद्ध केली.

देशातील एकूण १७ राज्यांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून महाराष्ट्राच्या २९ खेळाडूंचा संघ विविध वयोगटांत उतरला होता.

महाराष्ट्राने एकूण ८ सुवर्ण, २ रजत आणि ३ कांस्य अशी एकूण १३ पदकांची कमाई केली.१८ वर्षांखालील गटातील टाइम ट्रायल प्रकारात कु. तनुजा बागुल हिने कांस्य पदक पटकावले, तर याच गटात कु. योगेश सोनवणे याने सुवर्ण पदक जिंकत महाराष्ट्राच्या पदक खात्याची सुरुवात केली. महिला खुल्या गटात प्रणिता सोमण हिने २ रजत पदक मिळवले, तर मनाली रत्नोजी हिने कांस्य पदक पटकावले. 'साखळी टाइम ट्रायल' या सांघिक प्रकारात महाराष्ट्राच्या संघाने सुवर्ण पदक जिंकत विशेष यश संपादन केले. या विजयी संघात विठ्ठल भोसले (पुणे), हर्षद पाटील (कोल्हापूर), योगेश सोनवणे (नाशिक), प्रणिता सोमण (अहिल्यानगर), मनाली रत्नोजी (पुणे) आणि तनुजा बागुल (नाशिक) यांचा समावेश होता.

डाऊन हिल प्रकारात पुरुष गटात विरेंद्र माळी (पुणे)याने रजत पदक, तर महिला गटात आसावरी काळे (पुणे)हिने सुवर्ण पदक पटकावले. विविध वयोगटांत (१४, १६, १८, २३ व खुला गट) महाराष्ट्राने उल्लेखनीय कामगिरी करत मुला आणि मुली दोन्ही गटांत 'रनर अप' स्थान मिळवले. तसेच 'ओव्हर ऑल चॅम्पियनशिप' मध्येही महाराष्ट्र संघाने 'रनर अप' चषक पटकावला.

संघाचे प्रशिक्षक बिरू भोजने आणि यशोधरा शेरकर यांनी खेळाडूंना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. पांडुरंग भोजने यांनी मेकॅनिकल सहाय्यक म्हणून तर प्रवीण वाघमारे यांनी टीम मॅनेजर म्हणून जबाबदारी सांभाळली.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष ॲड. विक्रम रोठे, मानद सचिव प्रा. संजय साठे, उपाध्यक्ष अविनाश कदम, यशवंत नडगम, विजय जाधव, प्रा. साईनाथ थोरात, अभिजित मोहिते, दिपाली पाटील तसेच खजिनदार भिकन आंबे यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्राच्या या दमदार कामगिरीमुळे राष्ट्रीय स्तरावर राज्याचा मान उंचावला असून पुढील स्पर्धांसाठी संघाचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला आहे.

पाली भाषेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी सर्वोत्तपरी मदत - नगरसेवक सुरेश बनसोडे

- असंख्य जेष्ठानी दिली परीक्षा व झाले पास

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

बौद्ध धर्माची असंख्य ग्रंथ पाली भाषेत आहेत ती वाचण्यासाठी असंख्य जेष्ठ नागरिकांनी ती शिकली व परीक्षेत पास झाले व आज नगरमधील दोन वर्षात पास झालेल्या १३० विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र देताना मनस्वी आनंद होत आहे,पाली भाषेचा प्रचार,प्रसार करण्या साठी मी सर्वोत्तपरी मदत करेल असे प्रतिपादन नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी केले. बुद्ध विहार समन्वय समिती ,पालीभाषा प्रचार प्रसार समिती,नागपूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पाली भाषा प्रसार परीक्षा प्रमाणपत्र वाटप प्रसंगी आयुष्यमान नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी प्रतिपादन केले.

सदर कार्यक्रम सिद्धीबाग येथील सिद्धार्थ बुद्ध विहार येथे संपन्न झाला .कार्यक्रमाची सुरुवातीला आदर्शांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्रिसरण पंचशील ,बुद्ध पूजा भिमस्मरण -भीम स्तुती घेऊन करण्यात आली. त्यानंतर नवनिर्वाचित नगरसेवक सुरेश बनसोडे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक आयु.सुरेश बनसोडे, भारतीय बौद्ध महासभा शहर कोषाध्यक्ष तथा पालीभाषा प्रसार पर्यटन समिती व बुद्ध विहार समन्वय समिती अहिल्यानगरचे अध्यक्ष विजय चाबुकस्वार, समन्वयक मोहन शिरसाट ,रविंद्र कांबळे, भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेचे अध्यक्ष दिपक पाटोळे , सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, शशिकांत घोडके ,राजेंद्र थोरात ,विजय पाटोळे, युवराज बनसोड ,राजेंद्र पाडळे, जिल्हा शाखेचे माधवराव चाबुकस्वार, प्राचार्य विलास साठे ,प्राचार्य लक्ष्मण जाधव, प्रकाश खंडागळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा उपाध्यक्ष भगवंत गायकवाड सर होते.

ज्येष्ठ विधीज्ञ अँड. सतीश गोरडे यांचा सत्कार

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहमंत्री तथा ज्येष्ठ विधीज्ञ अँड. सतीश गोरडे यांना प्रतिष्ठेचा पद्मश्री नारायण सुर्वे "भला माणूस" पुरस्कार मिळाल्याबद्दल विश्व हिंदू परिषद, अहिल्यानगर जिल्हा यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा सहमंत्री शरद नगरकर, धर्मयात्रा जिल्हाप्रमुख राजेंद्र चुंबळकर, अनिल देवराव, जिल्हा मंत्री उत्तर विशाल वाघचौरे, विशेष संपर्क प्रमुख योगेश मखाना, प्रसाद घोगरे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. सदर पुरस्कार हा गोरडे यांची पुनरूस्थान समरसता गुरूकुलम,विधिसाक्षरता , कैद्यांसाठी कायदेविषयक साहाय्य, कौटुंबिक मोफत समुपदेशन आणि अन्य सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांची पुरस्कार साठी निवड झाली आहे. हा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गाव संकल्प व प्रकल्पाचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच ८६ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पोपटराव पवार यांनी सतीश गोरडे यांचे सामाजिक, विधी आणि राष्ट्रकार्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदान कौतुकास्पद असल्याचे सांगितले. त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांना देखील अभिनंदन केले आणि उपस्थितांना सतीशजींच्या कार्याची माहिती दिली. उपस्थित मान्यवरांनी सतीशजींच्या कार्याचे कौतुक केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मेहेरबाबाचा जन्मोस्तव कार्यक्रम

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

नगर मधील सरोष पेट्रोल पंपाशेजारील अवतार मेहेरबाबा नगर केंद्रामध्ये अवतार मेहेरबाबाच्या १३२ वा जन्मोस्तव कार्यक्रम दि २५ फेबु ला होणार आहे अशी माहिती डॉ मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली. दि २५ रोजी पहाटे ६ वा अवतार मेहेरबाबा याचा जन्मोस्तव सोहळा होणार आहे,याप्रसंगी विविध कार्यक्रम होणार आहे. नगरसह देश विदेशातील भाविक यावेळी गीते सादर करतील.तर बाबा कार्या विषयी प्रवचन हि होणार आहे ,नंतर सकाळी ९ वाजता मेहेरबाबाच्या सप्तरंगी ध्वजाचे अनावरण होणार आहे, यावेळी ध्वजगीत,भजन,आरती होईल. नंतर प्रार्थाना व प्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.

अखंड हिंदुस्थानच्या दैवताला ठिकठिकाणी अभिवादन

कंधार : (समर्थ गांवकरी)

अठरा पगड जाती-धर्माला एकत्रित घेऊन मावळे ही समान पदवी देत पर नारी ला मातेसमान दर्जा देण्याची शिकवण देणारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक कुळवाडी भूषण श्रीमंत योगी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त फुलवळ येथे ठिकठिकाणी प्रतिमेचे , पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समस्त ग्रामस्थांच्या वतीने सार्वजनिक जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक अभिवादन करण्यात आले. व उपस्थित नागरिकांना आनंदा पवार , दत्ता डांगे व गणेश मंगनाळे यांच्या वतीने महाप्रसाचे वाटप करण्यात आले. काही दिवसांपूर्वी याच चौकाच्या चबूतऱ्याला एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने चबुतरा जमीनदोस्त झाला होता . परंतु त्याच ठिकाणी नव्याने चबुतरा उभारून छत्रपती शिवाजी महाराज चौकाचा फलक लावण्यात आला याच ठिकाणी आज शिवजयंती सोहळा पार पडला.

यावेळी आनंदा पवार , दत्ता डांगे , गणेश मंगनाळे , गंगाधर शेळगावे , धोंडीबा बोरगावे , सादख शेख , आमृता मंगनाळे , बसवेश्वर शेळगावे , संदीप मंगनाळे , श्रीकांत मंगनाळे , केदारेश्वर फुलवळे , बालाजी बोरगावे , सह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

तसेच ग्राम पंचायत कार्यालयात सरपंच , ग्रामविकास अधिकारी , ग्रामपंचायत सदस्य व सर्व कर्मचारी , श्री बसवेश्वर विद्यालयात मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

तसेच ग्राम पंचायत अंतर्गत असलेल्या सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले यावेळी गोरिबी शेख , सुभद्रा फुलवळे , संगीता जोंधळे , सुनीता शेकापुरे , वंदना होनराव , कविता देवकांबळे , कालिंदा गोधने , नंदाबाई बसवंते , महानंदा देवकांबळे सह चिमुकल्या बालकांची उपस्थिती होती. तर बसवेश्वर सार्वजनिक वाचनालय येथेही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती साजरी करून रयतेच्या राजाला अभिवादन केले.

महाराष्ट्र बालक मंदिर शाळेचे लेझीमपथक ठरले लक्षवेधी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

शिवजयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरात दरवर्षी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज यांच्या वतीने शहरात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या पताकांच्या फडक्यात आणि "जय भवानी, जय शिवाजी"च्या घोषणांनी शहर दुमदुमून गेले. ढोल-ताशांच्या गजरात, लेझीम पथक, पारंपारीक वादय असतात पहाटेपासूनच शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले युवकांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत शिवरायांना अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या मिरवणुकीत संस्थेचे पदाधिकारी तसेच महाराष्ट्र बालक मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अर्चना गिरी,माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे आदीसह सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता.

मिरवणुकीच्या अग्रभागी लाल टाकी रोडवरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळा सहभागी झाली होती. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत, हातात भगवे ध्वज घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिवकालीन देखावे सादर करत लेझीम डाव विविध चौकात खेळत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

मिरवणुकीची सुरुवात शहरातील प्रमुख चौकातून करण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, लेझीम पथकांच्या तालावर आणि भगव्या पताकांच्या फडक्यात वातावरण दुमदुमून गेले. काही ठिकाणी शिवकालीन देखावे, तसेच सामाजिक संदेश देणारे फलक सादर करण्यात आले.शहरातील प्रमुख मार्गांवरून मिरवणूक मार्गक्रमण करत असताना नागरिकांनी ठिकठिकाणी पाणी व बिस्किटाची व्यवस्था केली होती. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत असताना नागरिकांनी ठिकठिकाणी स्वागत केले. पोलीस बंदोबस्तात शिस्तबद्ध पद्धतीने कार्यक्रम पार पडला. शिवभक्तीचा उत्साह आणि ऐतिहासिक अभिमान यामुळे संपूर्ण शहर भगव्या रंगात न्हाऊन निघाले.

राज्यात लवकरच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार

मुखेड तालुका: (समर्थ गांवकरी)

राज्यात लवकरच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची लगबग सुरू झाली आहे. जानेवारी 2026 ते डिसेंबर 2026 या कालावधीत मुदत संपणार्या तसेच नवनवीन स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य शासनाने अधिकृत प्रभाग रचना तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या प्रक्रियेनुसार, 20 फेब्रुवारी 2026 पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. राज्यात ग्रामविकास विभागाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले आहेत.

संत रामपाल सेवा कमिटीच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

९९ भाविकांनी केले रक्तदान : सेवा कार्यातून भगवंतप्राप्ती -मोहनदास

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

संत रामपाल महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदान केल्याने अनेकांचे प्राण वाचतात.रक्तदानाची सेवा ईश्वरप्रिय आहे.सेवा कार्यातून भगवंतप्राप्ती होते.असे प्रतिपादन संत रामपाल महाराज सेवा कमिटीचे सदस्य मोहनदास (नागपूर)यांनी केले आहे. सतलोक आश्रम ढवळपुरी येथे ३९ व्या बोध दिवसानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात कार्यक्रमात रक्तदान शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात ९९ भाविकांनी रक्तदान केले.संत रामपाल महाराज सेवा कमिटीच्या रक्तदानाचे महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. याप्रसंगी संत रामपाल महाराज सेवा कमिटीचे मोहनदास (नागपूर),भगवानजी पाटील (पुणे),रमेशदास (नाशिक) कैलास दास, विश्वासदास (सातारा) उत्तमराव कदम दास,तसेच जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ.मनोहर देशपांडे,अकाउंट अधिकारी गजेंद्र सोनवणे,जनसंपर्क अधिकारी शरद बळे , गौरव पठाडे,धामणगांवकर , प्रिती चिपाडे ,प्रियंका अडागळे , किरण शिंदे,मेघा शिंदे,गौरव बागल,गया चव्हाण,सुलभा पवळ ,खरपुडे,पानगावकर, किशोर यादव आदी उपस्थित होते.

जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने रक्त संकलनाचे कार्य करण्यात आले.

आर्ट ऑफ लिव्हिंगचा महाशिवरात्री महोत्सव संपन्न

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

आर्ट ऑफ लिव्हिंग अहिल्यानगर शाखेतर्फे दरवर्षी प्रमाणे मोठ्या स्वरूपात यंदाही महाशिवरात्री महोत्सव साजरा केला गेला. अहिल्यानगर शाखेचे रुद्राभिषेक व रूद्रपुजा आयोजित करण्याचे सलग २१ वे वर्ष आहे. विश्वशांती चा महान संदेश देत संपूर्ण भारतात आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेतर्फे रुद्राभिषेक व रूद्रपुजेचे आयोजन करण्यात येते. या शुभदिनी नवनिर्वाचित महापौर ज्योती ताई गाडे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी महापौरांचा बंगलोर आश्रमातील ऋषीजी, व स्वामीजी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. आर्ट ऑफ लिव्हिंग अहिल्यानगर च्या गावडे मळा येथील ध्यान मंदिरात आयोजित महारूद्रपुजा व महारूद्राभिषेकाचा अहिल्यानगर शहरातील चारशे नागरिकांनी लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्हा भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा प्रिया ताई जानवे तसेच वॉर्ड मधील नवीन नगरसेवकांचा देखील सत्कार करण्यात आला. शारदाताई ढवन, संपत दादा बारस्कर, दिपाली ताई बारस्कर, बाळासाहेब पवार, ऋग्वेद गंधे,संध्याताई पवार, रोशनी ताई त्रिंबके,निखिल वारे, सचिन हरिदास कुसळकर, सुनील त्रंबके हे सर्व नगरसेवक या प्रसंगी उपस्थित होते. सर्वच मान्यवरांनी संपूर्ण पुजेचा आनंद घेत महादेवाचे आशिर्वाद घेतले.

महाराजांनी घालून दिलेली नीतिमूल्ये आत्मसात करणे काळाची गरज : रामकृष्ण पवार

बुलडाणा : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बुलढाणा एसटी आगारात लोकराज्य छत्रपती शिवाजीमहाराज जयंती उत्सव स्वच्छता मोहीम चा जागर ठेवत उत्साहात साजरा करण्यात आला.

सिंहासन अधिष्टित शिवरायांची मूर्ती व बसस्थानका वरील सर्व महापुरुषांच्या तैलचित्रांना आकर्षक फुलांच्या माळा घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी सगळे प्लेटफॉम फुलांनी व रांगोळी घालून

मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्याच्या मुख्यालयी असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बुलढाणा आगारात अवतरले होते शिवजयंती दिनी..!

एसटी बुलढाणा आगार छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती आयोजीत शिवजयंती कार्यक्रमात सर्व कर्मचारी अधिकारी यांच्या सहकार्याने मोठ्या उत्सवात साजरी झाली..छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमीत्त सर्वांचा आनंद ओसांडून वाहत होता.. सकाळी 10.30 मिनीटांनी कार्यक्रमाची सुरवात महाराजांच्या मूर्ती ला पुष्पहार घालून अन आरती करून सुरू झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख पत्रकार बाबसाहेब जाधव हे तर स्थानक प्रमुख रामकृष्ण पवार,कार्यशाळा अधीक्षक तुकाराम धारपवार,राजेश आराख ,वाहतूक निरीक्षक पद्माकर मगर ,वाहतूक निरीक्षक देवयानी बारी, वाहतूक नियंत्रक सविता ठाकरे आरती पवार -लहासे त्र्यंबक भागवत यांचे उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रम ला सर्व संघटनांचे नेते आवर्जून हजर होते आगार परिसर छत्रपती शिवरायांच्या घोषणांनी दणाणून गेला होता. आपल्या कार्यक्षेत्रात आणि जीवनात शिवाजी महाराज यांनी घालून दिलेले गुण अन नीतिमूल्ये अंगिकारने ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणात रामकृष्ण पवार यांनी केले.तर प्रमुख पाहुणे पत्रकार बाबासाहेब जाधव म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या जडणघडणीत व सैन्यात बारा बलुतेदार आठरा बलुतेदार तसेच गावकुसातील आणि गावकुसाबाहेरील समाजतील लोकांना सामावून घेतल्यामुळे त्यांच्या स्वराज्यात कधीही धार्मिक दंगल अथवा धार्मिक बंडखोरी झाली नाही. धार्मिक व सामाजिक सलोखा हे त्यांच्या स्वराज्याचे वैशिष्ट्य होते.आधुनिक काळातील धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक समायोजन या दोन तत्त्वांना छत्रपती शिवरायांनी आपल्या प्रशासकीय धोरणाचा भाग ठरवून स्वराज्याची उभारणी केली होती. छत्रपती शिवराय यांच्या मते सर्व धर्म श्रेष्ठ असून परमेश्वर हा एकच आहे. अशा सर्व धर्म समभाव माननाऱ्या छत्रपती शिवरायाना त्यांच्या जन्मदिनानिमित्त मानाचा मुजरा व सर्व राप कर्मचारी तसेच प्रवासी वर्गाला जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा ! . कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी बुलढाणा आगारातील कर्मचारी ,संघटना पदाधिकारी यांनी बहुमूल्य परिश्रम घेतले.यावेळी सचिन पिंगळे, अरूण जगताप, गणेश झोटे, भास्करराव जाधव, प्रल्हाद कांबळे, साहेबराव कुन्नर,भीमराव शिनगारे श्रीकृष्ण सोनोने, दिपक निकम,माधव ठाकरे , माधुरी सुरडकर, लक्ष्मी बंड, अनिता खिर्डेकर, सचिन खिर्डेकर राजेश आगाशे,संजय उबरहंडे,संदिप डुकरे, ,समाधान जुमडे ,आर एस उबरहंडे,गजानन जुंबड,विनोद चंदनशिव, रविंद्र अवसरमोल, भारत आराख,जितू साळवे,राजू शेळके,प्रकाश नरोटे,विष्णू खिरडकर विशाल राऊत,विद्या महाले ,सतीश गोंधळी सुरेश वखरे ,संदिप गायकवाड, प्रवीण कोसे ,दीपक मिसाळकर,शुभम मुळे , संदिप बेटोदे ,स्वप्नील पाटील ,योगेश कुलकर्णी, गव्हाणे संतोष काळे, किशोर भावसार,प्रवीण बुंधे,मंगेश ढोंण, सचिन शेळके,संतोष बावस्कर,राजेंद्र पवार इत्यादी असंख्य राप कर्मचारी अधिकारी वर्ग व प्रवासी मित्र बहुसंख्येने उपस्थित होते.